# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.

पोस्ट – शिर्डी, तालुका राहाता, जिल्हा- अहमदनगर – ४२३१०९

दुरध्वनी क्रमांक –(०२४२३) २५८५००, २५८७८०

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे ॲडव्होकेट पॅनलवरी मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे ॲडव्होकेट्स ची नेमणुक करणे आहे. त्याकामी खालील प्रमाणे अटी / शर्ती आहे.

१. मा.सर्वोच्च न्यायालयातील संस्थानचे कामकाज पहाण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा. सर्वोच्च न्यायालयातील कामकाजाचा २० वर्षाचा नियमित सराव असावा, तर मा. उच्च न्यायालयातील कामकाज पाहण्यासाठी इच्छुक अर्जदारांचा मा. उच्च न्यायालयातील कामकाजाचा १५ वर्षाचा नियमित सराव असावा.

२. अर्जदार किंवा फर्म यांची मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली/ मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे नोंदणी झालेली असावी.

३. अर्जदारावर कोणत्याही स्वरुपाचा फौजदारी गुन्हा कुठल्याही न्यायालयात दाखल झालेला नसावा किंवा प्रलंबीत नसावा. तसेच कुठल्याही पोलीस स्टेशनला त्यांचे विरुध्द फौजदारी तक्रार दाखल झालेली नसावी किंवा प्रलंबीत नसावी. व याबाबत त्यांनी सक्षम प्राधिका-यांसमोर केलेले शपथपत्र दाखल करणे आवश्यक आहे.

४. विनामुल्य सेवा देणा-या अर्जदारांना प्राधान्य देण्यात येईल. तथापी जे विधिज्ञ फी स्विकारु इच्छितात त्यांनी मा. सर्वोच्च न्यायालयातील / मा. उच्च न्यायालयातील संस्थानच्या प्रत्येक विधायक तारखेस किती फी आकारणार अथवा प्रकरणाची एकुण फी किती आकारणार संस्थानने एखाद्या विषयाचेबाबतीत आपले कायदेशीर मत मागवल्यास अशा प्रकरणात किती फी आकारणार व इतर तत्सम गोष्टींसाठी किती फी आकारणार, अशा रितीने आपणास संस्थानकडून किती मानधनाची / फी ची अपेक्षा आहे, याबाबतचा स्पष्ट उल्लेख अर्जामध्ये करावा.

५. अर्जदार यांनी यापुर्वी मा. उच्च न्यायालयात संस्थानच्या विरोधात काम केलेले नसावे. तसेच सध्याही अर्जदार संस्थानचे विरोधात काम करत नसावा व संस्थानचे पॅनलवर नेमणूक झाल्यास संस्थानचे हिताचे विरोधात काम करणार नाही, अशी लेखी हमी अर्जदारास द्यावी लागेल.

६. संस्थानचे पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची / कायदा सल्लागाराची नेमणूक ही तात्पुरत्या स्वरुपाची असून सर्व ॲडव्होकेट्स चा कालावधी नेमणूक तारखेपासून पुढील आदेश होई पावेतो राहील तसेच संस्थान पॅनलवर नेमलेल्या ॲडव्होकेटला संस्थानच्या सेवेत नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.

७. पॅनलवरील ॲडव्होकेटच्या संख्येचे बंधन राहणार नाही.

८. संस्थानचे पॅनलवर नियुक्ती झाल्यानंतर अर्जदाराने दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास किंवा पॅनलवरील नियुक्ती नंतर अर्जदाराच्या काही आक्षेपार्ह गोष्टी संस्थानचे हिताचे विरोधात आढळून आल्यास त्यांना विना नोटीस संस्थानचे पॅनलवरुन कमी केले जाईल. व सदर अर्जदार विधिज्ञा विरुध्द त्यांचेशी संबंधीत बार कौन्सीलकडे / बार कौन्सील ऑफ महाराष्ट्र आणि गोवा यांचेकडे तक्रार करण्याचा अधिकार संस्थानकडे राखून ठेवत आहे.

९. मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयात काम पहाणा-या ॲडव्होकेटने सामान्यपणे आकलन होईल अशी सर्व माहिती व सल्ला संस्थानला द्यावा लागेल.

१०. संस्थान पॅनलवर नेमणूक होणेसाठी अर्जदार – ॲडव्होकेट श्री साईबाबांचा भक्त असावा.

११. संस्थान पॅनलवर नेमणूक केलेल्या ॲडव्होकेटची नेमणूक कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार संस्थानला राहील. व तशी नेमणूक रद्द केल्यावर संबंधीत वकीलाने काम न पहाणे व सुपूर्त केलेले कागदपत्र संस्थानला परत देणे बंधनकारक राहील.

इच्छुक ॲडव्होकेट्सनी मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचे नांवे खालील ई- मेल आयडीवर आवश्यक कागदपत्रासह दि १५/०९/२०२० पावेतो आपले अर्ज पाठवावे, त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**ई-मेल आयडी-** saibaba@sai.org.in, legal@sai.org.in

**(कान्हूराज बगाटे )**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था.शिर्डी.**